पिंपरी चिंचवड महानगरपालिका
क क्षेत्रीय कार्यालय
कार्यपत्रिका क्रमांक-४
सभावृत्तांत

दि.- २/७/२०१४ वेळ -सकाळी १२:०० वाजता

------------------- -----------------------------

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क क्षेत्रीय समितीची मासिक सभा बुधवार दि.२/७/२०१४ रोजी दुपारी १२.०० वाजता क क्षेत्रीय कार्यालयाचे श्री.छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजीत करणेत आली होती सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य उपस्थित होते.

१) मा.जम सोनाली पोपट सभापती
२) मा. सौ.पानसरे अमिना महंमद
३) मा.कदम सदगुरु महादेव
४) मा.गिता सुशिल मंचरकर
५) मा. कैलास महादेव कदम
६) मा.शितोळे शैलजा बाबुराव
७) मा.काटे रोहितअप्पा सुदाम
८) मा.गायकवाड संध्या सुरदास
९) मा.शेडगे आशा सुखदेव
१०) मा.संजय केशवराव काटे

तसेच खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

मा. फुंदे डि.एम.-प्रभाग अधिकारी, श्री.लटपटे- प्रशासन अधिकारी, मा.खाबडे- कार्यकारी अभियंता, विदयुत, मा.खरात- कार्यकारी अभियंता, पापु, डॉ.गोरे- पशुवैद्यकीय अधिकारी, जावळे- उपअभियंता पापु, श्री.सोनवणे- उपअभियंता,विदयुत, श्री.दिलीप धुमाळ -उपअभियंता,विदयुत,श्री.शिंदे- उपअभियंता, स्थापत्य श्री.वाईकर- उपअभियंता स्थापत्य , श्री.अकबर शेख- कनिष्ठ अभियंता वि, श्री.रविंद्र भोकरे- सहा.आरोग्याधिकारी, श्री.पटेल- उद्यान निरीक्षक, श्री.कामत- सहा.उदयान निरीक्षक, श्री.शेख- शाखाअभियंता ,विदयुत.

------

मा.सभापती- सर्व सन्मा.सदस्य /सदस्या व अधिकारी यांचे स्वागत करुन सभेला सुरुवात करणेत येत आहे.

--

उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचे विषय सभाकामकाजात दाखल करुन घेणेत आले.

विषय क्रमांक २) स्वातंत्र्यसूर्य हुतात्मा भाई कोतवाल यांचे नांव चौकास देणेबाबत - मा.संध्याताई गायकवाड व मा.राजेंद्र काटे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक ३) प्रभाग क्र.६३ मध्ये पाहणी करुन विविध फलक,दिशा दर्शक फलक बसवण्याबाबत-मा.आशा शेंडगे,मा.संजय काटे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक-४) क प्रभाग समिती अध्यक्ष यांच्या केबीनमधील व क प्रभाग समिती सभागृहामधील खुर्च्यांना नवीन कव्हर बसविणेबाबत व कमी असलेल्या खुर्च्या उपलब्ध करून देणेबाबत- मा.श्रीमती गिता सुशिल मंचरकर,मा.संध्या गायकवाड यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक-५) एच.ए.वसाहत आतील परिसरातील साफसफाईबाबत-मा.सदगुरु कदम,मा.संजय काटे, मा.शैलजा शितोळे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक-६) फायबरचे मुतारी बसवून मिळणेबाबत- मा.कैलास कदम,मा.संजय काटे,मा.शैलजा शितोळे यांचा प्रस्ताव.

ठराव क्रमांक-५८ विषय क्रमांक- १

दिनांक- २/७/२०१४ विभाग- प्रशासन

सुचक-मा.शैलजा शितोळे अनुमोदक-मा.संजय काटे

संदर्भ –मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र.नरवि/कावि/१५/पिंपरी/५५/२०१४ दिनांक ०२/०६/२०१४

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

मुंबई प्रादेशिक व महापालिका अधिनियम १९४९ चे कलम २०५ अन्वये प्रस्तापित केलेला मौजे पिंपरी येथील सि.स.नं.५६८७ व ५६८७/१ ते १२ या मिळकती वरील १० फुट रुंदीचा रस्ता रद्य करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.

ठराव क्रमांक-५९ विषय क्रमांक- २

दिनांक- २/७/२०१४ विभाग-

सुचक-मा.संध्या गायकवाड अनुमोदक-मा.सोनाली जम

संदर्भ- मा.संध्याताई गायकवाड व मा.सोनाली जम यांचा दि.२/७/१४ रोजीचा प्रस्ताव.

वॉर्ड क्र.६२ अ मध्ये कै.रामभाऊ काटे पूल ते पुना-मुंबई हायवेला जोडणा-या चौकास स्वातंत्र्यसुर्य हुतात्मा भाई कोतवाल यांचे नांव देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक- ६० विषय क्रमांक- ३

दिनांक- २/७/२०१४ विभाग-

सुचक-मा. आशा शेंडगे अनुमोदक-मा. संजय काटे

संदर्भ- मा. आशा शेंडगे,मा.संजय काटे यांचा प्रस्ताव.

कासारवाडी प्रभाग क्र.६३ मध्ये अनेक इमारती,चौक परिसरास नामकरण फलक बसविणेत आलेले नसल्याने सदर प्रभाग क्र.६३ कासारवाडी परिसराची पहाणी करुन आवश्यकतेप्रमाणे फलक, दिशा दर्शक फलक बसविणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक- ६१ विषय क्रमांक- ४

दिनांक- २/७/२०१४ विभाग-

सुचक-मा. गिता मंचरकर अनुमोदक-मा. संध्या गायकवाड

संदर्भ- मा.गिता सुशिल मंचरकर,मा.संध्या गायकवाड यांचा प्रस्ताव.

क प्रभाग समिती अध्यक्ष यांच्या केबीन मधील व श्री.छत्रपती शिवाजी महाराज सभागृहातील खुर्च्या खराब झालेल्या असल्यामुळे त्यांना त्वरीत कव्हर बसविणेस व कमी पडत असलेल्या खुर्च्या त्वरीत उपलब्ध करणेत याव्यात.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक- ६२ विषय क्रमांक- ५

दिनांक- २/७/२०१४ विभाग-

सुचक-मा. संजय काटे अनुमोदक-मा.शैलजा शितोळे

संदर्भ- मा.सदगुरु कदम,मा.संजय काटे, मा.शैलजा शितोळे यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्र.४० खराळवाडी अंतर्गत हिंदस्तान अंटिबायोटिक्स लि.(भारत सरकार उपक्रम) या कंपनी मधील कर्मचारी व अधिकारी यांचेकरिता निवासी वसाहत असुन त्यामधील साफसफाईचे कामकाज यापुर्वी कंपनीच्या व्यवस्थापनातून करण्यात येत होते.परंतू मागील पाच वर्षापासून कंपनीची आर्थिक परिस्थिती डबघाईला आल्या कारणाने वसाहती आतील कर्मचारी व अधिकारी यांना कुठल्याही प्रकारची सुविधा कंपनीच्या व्यवस्थापनाने बंद केले आहे. त्यामुळे तेथील नागरिकांना आरोग्य विषयक परिस्थितींना सामोरे जावे लागत आहे.तरी मानवतेच्या दृष्टीकोनातून सदर वसाहतीतील नागरिकांना महापालिकेमार्फत आरोग्य विषयक सोयी सुविधा पुरवण्यात याव्यात त्यामध्ये वसाहतीतील अंतर्गत रस्ते व परिसराची साफसफाई ही मनपा वा खाजगी संस्थेद्वारे करण्यात यावी

. सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक- ६३ विषय क्रमांक- ६

दिनांक- २/७/२०१४ विभाग-

सुचक-मा. संजय काटे अनुमोदक-मा.शैलजा शितोळे

संदर्भ- मा.सदगुरु कदम,मा.संजय काटे, मा.शैलजा शितोळे यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्र.४१ गांधीनगर अंतर्गत प्रभागामध्ये डेक्कन होंडा शोरुमच्या समोर पीएमपीएलच्या बस स्टॉपकरिता आरक्षित जागा असून या जागेमध्ये हॉकर्सझोन असून सदर ठिकाणी वेगवेगळया साहित्यांची खरेदी विक्री होते. त्याठिकाणी नागरिकांची ये-जा असून सदर परिसरातील नागरिकव व्यवसायिकांकरिता पुरुष मुतारी उपलब्ध नसून सदर परिसरात नागरिक उघडयावर शौचास बसतात व त्यामुळे तिथे आरोग्य विघातक परिस्थिती निर्माण होत आहे व नागरिकांच्या तक्रारी येत असल्याने सदर परिसरात मुतारी बसविणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

---

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

सही/-
(जम सोनाली पोपट)
सभापती
क क्षेत्रीय समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
क क्षेत्रीय कार्यालय भोसरी २६
जा.क्र.कक्षेका/कावि/ ७५९ /२०१४
दि. १४ / ७ /२०१४



प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
क क्षेत्रीय समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

प्रत- सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

---